**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.org

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

**वर्ष ८९ वे) प्रभुतरुण मुंबई, मंगळवार, ता. १६ माहे ऑक्टोबर, सन २०१२ (अंक ९९७**

*संपादकीय*

## बदल

—सुहासिनी कीर्तिकर

परवा एका लेखाचे शीर्षकच 'भाषा कूस बदलते आहे' असे होते. म्हणजे पूर्वीचे शब्द संपवून त्याजागी नवीन शब्द भाषेत येतात. भाषा प्रवाही असल्याने ते येणारच नं! अहो, भाषा बदलते कारण भोवतालचे पर्यावरण बदलते, संस्कृती बदलते, जगणेच बदलते! जेव्हा राम गणेश गडकऱ्यांचा जमाना होता तेव्हा एखाद्याची 'गोची' केली तर त्याचा 'मोरू' झाला म्हणण्याची टूम होती. काळ बदलला तसे हे मोरूप्रकरण मागे पडले. मग खाद्यसंस्कृतीचा विजय होऊन त्याचा 'वडा झाला/ केला' असे बोलले जाऊ लागले. ह्याच वड्याचा संदर्भ घेऊन फक्त त्याचा 'गरगरीत' केला बनले. भाषिक 'बनवाबनवी' अशी अखंड चालूच असते. मग कुणाचा 'पचका' होऊ लागला, कुणाला 'वांगे करणे' आवडू लागले, कुणाला 'फाट्यावर मारून' त्याची 'गोची' करणे जमू लागले. असे होणे गरजेचच असतं. आपल्या भावना व्यक्त होण्यासाठी अन् भाषेच्या जगण्यासाठी. आता नुकताच 'इंग्लीश विंग्लीश' चित्रपट आलाय. वाचताना चुकचुकलात ना? ह्या चित्रपटाचं नाव आहे 'Englisश Wingliश'! यातला 'श' आहे मराठीतला. 'विंग्लीश'ला तर; म्हटलं तर काहीच अर्थ नाही. पण तरीही त्यात व्यक्त होण्याची ताकद आहेच. संस्कृतीनं कात टाकली की भाषा बदललीच.

आता अगदी मागल्या एकदोन दशकातली संस्कृती किती बदलली पहा बरं. प्रवासी गाडीत ऑफीसला (ऑफीस हं, कचेरी नव्हे!) जाता जाता कमावत्या बायका विणकामाच्या सुया काढत अन् वीणकाम करीत. आता लोकरीच्या धाग्यांची जागा वायर्सनी घेतली. आजची कमावती बाई पर्समधून वायर काढते अन् कान बंद करून गाणी ऐकते. तिच्या हातातली क्रोशेची सुई गेली अन् मोबाईल 'ऑपरेट' करणारी 'स्टायलस' आली. ढळढळीत पिंजर असलेलं कुंकू गेलं अन् 'बाथरूमला सौभाग्यवती' करणाऱ्या टिकल्या आल्या. त्याही टिकल्या नाहीतच. आता सवाष्णीही 'भुंड्या' ('भुंडा' हा शब्द माहित्येय आजच्या पिढीला? नसेलच!) कपाळानं अन् भुंड्या हातांनी वावरतात. संस्कृती बदलत गेली तर काय काय टिकणार? नागिणीसारखा लांबलचक शेपटा गेला.

'पाठमोरी मूर्ती तव ही पाहिली मी कौतुके
वाटले त्वत् कुंतली या लोपली सारी सुखे'

अशा भावनेतलं सुख लोपलं. एकेकाळी माथ्यावरून शिकेकाईनं न्हायल्यानंतर मोकळ्या केसांनी साधं ओटीवर यायलाही बंदी होती. 'गाठ मार, खाली गाठ मार' अशी ताकीद मिळायची. आता पहा नं; अगदी 'बॉयकट'च नाही- चकोटच ठेवणाऱ्या बायका; नाहीतर येताजाता 'झिपऱ्या'('झिपऱ्या' हा शब्द पुन्हा आजचा नाहीच.) विंचरणाऱ्या बायका गाडीत असतात. भाषा बदलणारच नं? कारण दैनंदिन जीवन बदललं, संस्कृती बदलली. 'कशिदा काढू कशी?' विचारत सजणाचे 'डोळे हे जुलमी गडे' म्हणत त्याच्याशी प्रेमभाषा करणारीच बदलली. बदल हवाच. 'गवत उंच दाट दाट, वळत जाई पायवाट' उरली नाही, 'प्रियेचे झोपडे' आता कुठले? आता असलाच तर 'झोपडे' ऐवजी

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## ANGRY KYA?

-Vaijayanti Kirtikar

A manager comes home very grumpy. His wife asks what has happened. The manager says "The employee I can scream and shout at didn't show up today".

Anger!! Don't we all get angry? After all it is a normal emotion. To prove my point I asked a few of my 'normal' friends what ticks them off in their everyday lives. I was not surprised to see how my friends were getting affected by the trivial things in life. Let me quote some here:

✳ Men spitting on the road (I agree, I wish I had a gun.)
✳ Men converting public places into public washrooms (I agree on this one too, I mean if we women can hold it, then why not men?)
✳ The maid plays truant and does not show up for work (The most common anger catalyst.)
✳ Finding that the hot babe staying two floors below has already left for college and I missed catching a glimpse (straight from the heart of a guy ofcourse.)
✳ The noise my armchair makes when I lean on it to grab the TV remote (this is an exclusive one.)
✳ That stupid table in my room which loves to hurt my toe (I am sure my mom will identify with this one, after all she does get mad when she accidentally collides with anything, or as per her perspective, the things collide with her, even if it means the kitchen wall colliding with her and it hasn't even moved from its place as far as I can remember!)
✳ See people walking in the middle of the road instead of walking on the cornes (Wait, what corners? Maybe this 'normal' friend of mine means footpaths or roadsides, or maybe he is playing Ludo.)
✳ Auto rickshaw drivers who don't even battle an eyelid while saying no to go to our desired location (yes, yes, I hear you all asking the driver "Kahan jaoge, Dubai?)
✳ Waiting for someone (Isn't life all about wait and hope?)
✳ Getting stuck in traffic jams (I have never understood why this situation generates so much frustration. I have always enjoyed getting stuck in traffic jams, I get time to be simply useless, time to look around aimlessly and then it is not my fault that I am reaching late for that all so important meeting or job interview, it his destiny!)
✳ Incompetent boss (Now, this is an universal truth)
✳ Calls not answered (Come on, we have all ignored calls at some point of time. Accept the fact that they simply do not like you as much as you would like them to answer your call.)
✳ Moronic women deciding to cross in front of my car at the last minute and laughing (I have often been part of this moronic women gang, sorry to be the reason for your distress dear friend)
✳ When marriage proposals for my daughter fizzle out (from a distraught mother of two, we all understand. The daughter in question is 18 years old, now I don't understand)
✳ When my son talks rudely to me (again from the same mother of two)
✳ Guys ogling at you (loved the part in the movie Darfi where Ranbir Kapoor lifts his trousers to show his leg to the man ogling at Priyanka Chopra's legs)

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

‘टॉवर’, पायवाटेऐवजी पेवर्स ब्लॉक्स अन् उंच दाट गवत आता ‘ग्रीन पॅच’ राखतच येणार. ‘मला मदत कर’ म्हणणारी शेजारीण आता ‘माझी मदत कर’ म्हणत ‘रिक्वेस्ट’ करणार. (विनंती? छे! छे!!) सगळीकडेच बदल,बदल अन् बदल!

या बदलाशी जुळवून घ्यावेच लागते. नाही घेतलंत जुळवून तर तिथेच थांबा! अन् ‘थांबला तो संपला!’ गतीचा कायदा पाळायचा असेल, जीवनाला सामोरे जाऊन काही घडवायचे असेल तर बदलायला हवंच. पहिले ‘दर्पण’ मराठी इंग्लीश होते. पुढे बदलत मराठी, मराठी झाले. नंतर संपलेच. पण आपल्याला एका अस्तातून दुसरा उदय (नारायण लाळे यांच्या कवितासंग्रहाचं नाव आहे ‘अस्तोदय’), अस्तोदय साधायचा असेल तर बदलायला हवंच- सकारात्मक बदल भाषा, संस्कृती, जगणं यांनी स्वीकारायला हवेत. ‘जानम् समझा करो!’ ‘ना समझे वो अनाडी’ असतो हो.

आणखी एक. काही ूदब सकारात्मक असतात. हे सकारात्मक बदल स्वीकारायला उदात्त, मोकळी मनोवस्था लागते. नसली तर आपलाच ‘बफ्फी’ व्हायचा! ‘प्रभुतरुण’कारांच्या समर्थ आणि द्रष्ट्या संपादकांनी (कै. विहंग नायक आणि कै. सुहास कोठारे यांनी) हे सकारात्मक बदल जाणीवपूर्वक स्वीकारले म्हणूनच ‘चमन आज खाली नही है।’ हो की नाही? बहारे और आतीही रहेंगी!

# मारकुटे शिक्षक

**-अजित मानकर**

शाळेतील शिक्षकांनी मुलांना वाईट वागणूक दिल्याच्या बातम्या हल्ली वरचेवर आपल्या कानावर येत असतात. त्याच प्रकारचा एक प्रत्यक्ष घडलेला किस्सा मी आपणास सांगू इच्छितो.

आमचा नातू क्रिश त्यावेळी वय वर्षे ९, हा इयत्ता चवथीमध्ये बालमोहन प्राथमिक शाळेत शिकत होता. तरुण वर्गशिक्षक उच्चशिक्षित कुमारी खानमॅडम नुकत्याच बी.एड. करून शाळेमध्ये प्रोबेशनवर नोकरीत रुजू झाल्या होत्या. मात्र स्वभाव अत्यंत तापट असल्याकारणाने प्राथमिक वर्गातील मुलांशी कसे प्रेमाने जुळवून घ्यायचे हेच त्या वरचेवर विसरत असत.. साहजिकच मुलांमध्ये व पालकांमध्येसुद्धा त्या लवकरच अप्रिय होऊन बसल्या व हळुहळू त्यांच्याविरुद्ध प्रिन्सिपल व हेडमास्तरांपर्यंत पालकांच्या लेखी तक्रारीसुद्धा सुरू झाल्या.

एके दिवशी अत्यंत क्षुल्लक कारणाने वर्गातील एका मुलीवर त्या भयंकर भडकल्या व हातात पट्टी सरसावीत रागाच्या भरात तिच्यावर ओरडल्या की परत अशी चूक केलीस तर सरळ थोबाडीतच ठेवून देईन.

हे ऐकताच छोटा क्रिश वर्गात ताडकन् उभा राहिला आणि न राहवून खानबाईंना उलट म्हणाला की तुम्ही आम्हा मुलांना मारू शकत नाही व तसे धमकावूही शकत नाही, कारण तुम्हाला तो अधिकारच नाही!

झाले! आधीच भडकलेल्या बाईंचा पारा आणखीनच उसळून आला. त्यांनी रागाच्या भरात ताबडतोब नोट लिहिली आणि क्रिशच्या आईला म्हणजेच आमच्या स्वेताला शाळेत येऊन भेटण्याविषयी फर्मावले.

दुसरे दिवशी क्रिश व स्वेताला चौकशीसाठी हेडमास्तरीणबाईंसमोर उभे करण्यात आले व सर्व घडलेला प्रकार खानबाईंनी कथन केला. आश्चर्य म्हणजे हेडमास्तरीणबाई मात्र हे सर्व ऐकून अवाकच झाल्या.

त्यांनी क्रिशला प्रथम विचारले, ‘हे सर्व खरे आहे का? तू काल वर्गात बाईंना असे बोललास का?’

त्यावर क्रिशने कबूल केले की तो असे बोलला होता. दुसरा प्रश्न हेडमास्तरीणबाईंनी क्रिशला विचारला, ‘तू असे का बोललास?’

क्रिशने शांतपणे पण आत्मविश्वासाने उत्तर दिले, ‘गेल्या वर्षीच्या इयत्ता तिसरीच्या वर्गशिक्षिका दामलेमॅडमनी आम्हाला वर्गात सांगितले होते की हल्ली भारत सरकारने कायदा करून शिक्षकांना मुलांवर हात उगारण्यास व तत्सम शारीरिक इजा करणाऱ्या शिक्षेवर कायद्यानेच बंदी घातलेली आहे व तसे करतांना एखादा शिक्षक आढळलाच तर त्या शिक्षकाविरुद्ध व शाळेविरुद्ध पोलिसांमध्ये गुन्हा दाखल होऊ शकतो. गेल्या वर्षीच्या वर्गशिक्षकबाईंनीच आम्हास हे समजाविलेले असल्यामुळे मला तेच अभिप्रेत होते व मी तेच खानमॅडमना बोलून दाखविले आहे.’

क्रिशला त्यानंतर ताबडतोब वर्गात जाऊन बसण्यास हेडमास्तरीणबाईंनी फर्मावले व स्वेताला त्रास दिल्याबद्दल शाळेतर्फे रीतसर दिलगिरी व्यक्त करून घरी जाण्यास अनुमती दिली. मात्र खानबाईंना हेडमास्तरीणबाईंनी केबिनमध्ये थांबवून घेतले व मुलांना धमकावण्याच्या त्यांच्या सवयीबद्दल खरपूस झाडले व सक्त ताकीदही दिली. कारण त्यांच्या मते शिक्षिकेच्या वर्गातील अशा वर्तणुकीमुळे आणि या प्रकारामुळे कायद्याची पायमल्ली होऊन खुद्द शाळाच संकटात येत होती!

एवढे सर्व होऊनही खानबाईंच्या वागणुकीत पुढेही काही सुधारणा झाली नाही व अनेक पालकांनी त्यांच्याविरुद्ध केलेल्या तक्रारींची दखल घेणे शाळेला क्रमप्राप्तच होते!

वर्ष संपले व जेव्हा नवीन वर्ग जून महिन्यात सुरू झाले तेव्हा खानबाई शाळेच्या शिक्षकपटावर पुन्हा आढळल्या नाहीत हे वेगळे सांगणे नलगेच!

(पान १ कॉलम ४ वरून)

✳ People coming to your place and forgetting to go back home (Classic one, contributed by my husband, so I completely identify with this and also know the people with the weak memory) Atithi tum kab jaoge!! and the list goes on.

At times we take life and things around us too seriously and then we end up having difficulties overcoming our anger. We can be in only two situations. Situations we can change and situations we are helpless about. Either ways, anger does not help improve the situation in any scenario. When anger gets out of control, it affects our work, relationships and quality of life.

All said and done, I don't get angry often. I try not to get upset about much really. For the most part, I do manage to keep my anger in check. However, there are still some things that just irk me.

✳ Healthy food being more expensive than junk food. (Seriously, I can buy an entire huge party pack of chips at the same price that I buy a Kilo of carrots!)

✳ My sister spoiling it all by revealing the name of the winner of the Masterchef series when I am just catching up with the initial episodes.

✳ That girl with the perfect silky, thick, long hair while I fight to save the few messy strands on my head

I recently read on a T-shirt "Outwardly I am very upset, Inwardly I am quite calm."

A perfect slogan to lead an ideal stress free life. It doesn't sound that difficult? No, it doesn't work for me though.

I want to bang the phone when my sister is revealing the story of 'Grey's Anatomy' next episode to me. I blame the government for the healthy and junk food price mix-up and in the process rendering me unhealthy. That girl with the beautiful stresses, well, I have not yet decided on how to vent my anger.

Anger Management? Outwardly I am quite calm, Inwardly I AM VERY UPSET!!

# सद्‌गुणांची जेथे प्रचिती; तेथे कर माझे जुळती

**-सुहासिनी सुहास कोठारे**

मध्यंतरी श्री. चंद्रकांत कुळकर्णींनी दिग्दर्शित केलेला ‘तुकाराम’ चित्रपट बघितला. फार पूर्वी आलेला तुकाराम चित्रपट सर्वांच्या चांगलाच स्मरणात आहे. त्याची लोकप्रियता खूप होती. विशेषत: तुकारामाची भूमिका करणाऱ्या विष्णुदास पागनिसांची तसेच तुकाराम देवळात अभंग गाताना विठ्ठलाची मूर्ती नाचू लागते हे दृश्य फार लोभस वाटत असे.

परंतु नवीन तुकाराम चित्रपट बघताना जुन्या तुकाराम चित्रपटाची तुलना करणे बरोबर नाही. कारण काही झाले तरी आजचा चित्रपट एकविसाव्या शतकातील आहे. जुन्या तुकाराम चित्रपटात तुकारामांचे अभंग पाण्यात बुडविल्यानंतर थोड्याच दिवसात ते पाण्यात तरून येतात, ते बघताना मन भरून येत असे. नवीन तुकाराम चित्रपटात मात्र तुकारामाचे अभंग पाण्यातून तरून येत नाहीत, तर ते पाण्यात बुडविल्यानंतर थोड्याच दिवसात प्रत्येक व्यक्तीच्या मुखातून ‘पांडुरंग पांडुरंग’ असा विठ्ठल नामाचा गजर सुरू होतो. अशा तऱ्हेने तुकारामाचा हरीनामाचा जप व ध्यास सर्व लोकमानसात पसरतो, असे हे हृदयस्पर्शी दृश्य पाहून डोळ्यात आनंदाश्रू उभे राहतात.

त्याचवेळी मनात विचार आले, खरेच देव मूर्तीत नसून प्रत्येक व्यक्तीच्या मनात असतो. आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी आपण देवाला साकडे घालतो. पण देव कुणाच्याही रूपाने आपल्यासमोर येऊन आपले कार्य पूर्ण करतो.

मुंबईसारख्या शहरात अनेक अडचणीच्यावेळी तो कुणाही व्यक्तीच्या रूपाने आपल्याला भेटतो. कधी वाहनांचा संप, कधी अतिवृष्टी अशावेळी एकादी रिक्शा, टॅक्सी अचानक आपल्याला मिळाली तर आपण त्या रिक्शावाल्याला देवासारखा भेटलास म्हणून त्याचे आभार मानतो. कधी बँकेत, म्युनिसिपल कार्यालयात, पोस्टात कितीही प्रयत्न केले तरी आपली कामे काही होत नाहीत. ह्या टेबलाकडून त्या टेबलाकडे असे नुसते फिरावे लागते. अशावेळी एखादी कर्मचारी व्यक्ती, आपल्या स्वत:च्या कामातून वेळ काढून आपल्याला मदत करते व आपले काम लगेच होऊन जाते. अशावेळी ती व्यक्ती देवासारखी धावून आली असे वाटते.

अशी कितीतरी चांगली माणसे आपल्या आजुबाजूला, आपल्या निकटवर्तीयांमध्येसुद्धा असतात. त्यामुळे आपले जीवन सुरळीत चालू असते. परंतु मनुष्यस्वभावानुसार आपण फक्त व्यक्तिच्या दोषांकडे लक्ष देतो. प्रत्येक व्यक्ती गुणदोषविरहीत नसते. आपण प्रथम स्वत:कडे बघितले तर आपल्या स्वत:मध्येसुद्धा अनेक दोष असतात. आपण स्वत: किती लोकांना मदत करतो, किती जणांची कामे करतो हे लगेच जाणवते. दुसऱ्यांच्या श्रमाचे श्रेय ज्याचे त्यास द्यावयास हवे. दुसऱ्याचा आदर करणे हेच श्रेयस्कर आहे. हल्ली दूरदर्शनवरील विविध मालिकांतून सूडबुद्धीला खतपाणी घातले जाते. ते पाहून मन विषण्ण होते. दुसऱ्याचे वाईट चिंतणे त्यापेक्षा दुसऱ्याचे भले कसे होईल याचा विचार केला तर आपल्या मनास खूप शांती लाभते.

अशी दुसऱ्याचे भले चिंतणाऱ्या व दुसऱ्याला सतत मदत करणाऱ्या व्यक्तींना प्रणाम करावासा वाटतो.

लेखांक-१०

# कालची मुंबई-आजची मुंबई

**— विश्वास नारायण अजिंक्य**

वाळकेश्वरचे पहिले देऊळ आधी मुसलमान, नंतर पोर्तुगीज यांच्या परधर्मद्वेषापायी जमीनदोस्त झाले होते. अठराव्या शतकाच्या सुरुवातीला रामजी कामत नावाच्या सारस्वत धनिकाने वाळकेश्वरच्या देवळाचा जीर्णोद्धार केला. धार्मिक जुलुमांचा पाया मुसलमानांनी घातला. त्यांनी आरंभिलेल्या देव-देवळांच्या विध्वंसात मुंबईतील मुंबादेवी व महालक्ष्मी ही दोन देवळेसुद्धा बळी पडली होती. असे सांगतात की हिंदूंच्या हौदात, विहिरीत किंवा तळ्यांमध्ये पावाचा तुकडा टाकून हिंदूंना बाटवीत असत. आता चहाच्या दुकानात पाव-बिस्किटे, टोस्ट या पदार्थांचे सेवन धर्मांतराचे भय न वाटता मोठ्या आवडीने केले जाते. इंग्रजांच्या राजवटीत पाव-बिस्किटांसाठी बेकऱ्या व चहा पाजणारी दुकाने प्रथम भंडारी समाजाने काढली. भंडारी हे पिण्याची दारू तयार करणारे म्हणूनही प्रसिद्ध होते. पण ते शूर होते. इंग्रजांनी त्यांना आपल्या सैन्यात दाखल करून घेतले होते.

सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून जमीन आपल्या मालकीची आहे हे सिद्ध करण्याचे प्रयत्न आज जसे केले जातात तसेच ३५० वर्षांपूर्वी देखील केले जात असत. फेब्रुवारी १६६५ ते नोव्हेंबर १६६६ या जेमतेम दीड वर्षाहून अधिक कालावधीत हंफ्री कूक मुंबईचे गव्हर्नर होते. उच्च अधिकारपदाचा उपभोग घेत बनावट कागदपत्र तयार करून जमिनीवर मालकी सांगणाऱ्यांच्या कारस्थानात गव्हर्नर हंफ्री कूकही सामील असे. सरकारी पैशांची अफरातफर केल्याच्या आरोपावरून त्यांना गव्हर्नर पदावरून बडतर्फ करण्यात आले होते.

मंत्रालय हे राज्यकारभाराच्या इमारतीला नव्याने देण्यात आलेले नाव आहे. ते बांधले तेव्हा 'सचिवालय' म्हणजे 'सेक्रेटरीएट' हीच कल्पना होती. तेथे राज्याच्या वेगवेगळ्या खात्याचे सर्वोच्च अधिकारी बसून राज्याची सूत्रे हलवीत. त्यावेळी आज ज्यांना 'मंत्री' म्हणतो त्यांना 'मेंबर' या शब्दाने ओळखीत. आज ज्याला आपण गृहमंत्री म्हणतो त्याला 'होम मेंबर' हा शब्द होता. इंग्रज अमलदारांना त्यावेळी हांजी हांजी ऐकण्याची सवय होती. इंग्रज राजवटीत 'आपले अत्यंत आज्ञाधारक सेवक' असे पत्राखाली लिहून स्वाक्षरी करण्याची पद्धत रूढ होती.

मुंबई टाइमची परंपरा इंग्रजांचीच. पण व्हाईसरॉय कर्झन यांच्या मनातून मुंबईची घड्याळातून दाखविली जाणारी वेळ बदलून येथे 'स्टँडर्ड टाईम' सुरू करावयाचा होता. या दोन वेळात २९ मिनिटांचा फरक होता. तेव्हा फिरोजशहा मेहता यांनी परंपरागत वेळेचा अभिमान धरून कर्झन साहेबांचा डाव हाणून पाडला. फिरोजशहा मेहता हे मुंबई विद्यापीठाची एम. ए. ही पदवी घेणारे पहिले विद्यार्थी. महादेव गोविंद रानडे- भांडारकर हे पहिले बी. ए. खरे; पण त्यांनी एम. ए. ची परीक्षा पुढे काही वर्षांनी दिली. मुंबईत जे शिक्षण इंग्रजी राज्यकर्त्यांच्या प्रेरणेने सुरू झाले त्यात जुनी शास्त्रे पढविण्याचा हेतू नव्हता. तर युरोपातील निरनिराळ्या शास्त्रांच्या प्रगतीची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी हा उद्देश होता. शिक्षणासाठी जी पाठ्यपुस्तके तयार झाली ती आधी मुंबईत झाली. ही पुस्तके इंग्रज तज्ञांच्या देखरेखी-खाली शास्त्री मंडळींच्या मदतीने केली जात. पण बाहेरगावाहून मुंबईला शिकायला जायचे म्हणजे खाडी ओलांडणे आले व खाडी ओलांडणे म्हणजे समुद्रपर्यटनाचे पाप. विलायतेतून परतल्यावर तर लोक त्यांना वाळीत टाकीत. त्यांच्या पंक्तीला कोणी बसत नसे.

इंग्रजांच्या कारकिर्दीत मुंबईकरांना ज्या नव्या संवयी लागल्या त्यातली एक म्हणजे सकाळी किंवा संध्याकाळी फिरायला जाणे. ही सवय १९व्या शतकाच्या मध्यातील आहे. सुरुवातीला समुद्रकाठी माणसे जमायची ती प्रामुख्याने पारशी असायची. सुरुवातीला फक्त पुरुष मंडळीच येत. नंतर पारशी बायका येऊ लागल्या. कालांतराने सर्व जाती धर्मांचे लोक येऊ लागले.

एकेकाळी मुंबई शहराच्या सीमेपलिकडे शीवजवळील डोंगरावर वसलेल्या चुनाभट्टी गावात चुन्याच्या भट्ट्या होत्या . तेथे तयार होणारा चुनाच पूर्वी बांधकामांसाठी वापरला जात असे. ताजमहाल हॉटेल, के.ई.एम. रुग्णालयाची इमारत यांचे पक्के मजबूत बांधकाम या चुन्यातूनच घडवले आहे. या भट्ट्या १९४८ पर्यंत चांगल्या कार्यरत होत्या. सिमेंटचा वापर सुरू झाल्यावर या व्यवसायाला उतरती कळा लागली. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात मुळात आगरी कोळी लोकांची वस्ती असल्यामुळे सर्वत्र कोळीवाडे होतेच. मातीची भांडी वापरली जात म्हणून कुंभारांचा व्यवसाय चालू होता. त्यामुळे सर्वच उपनगरात कुंभारवाडे होते. धारावी येथे अद्यापही कुंभारवाडे आहेत. पण त्यांनाही आता घरघर लागली आहे.

२ डिसेंबर १९११ची पहाट मुंबईत उजाडली ती भल्यामोठ्या पांढऱ्या जहाजाच्या आगमनाने. भल्या पहाटे 'मदिना' शाही जहाजाच्या संरक्षक बोटींनी मुंबई बंदरात नांगर टाकले. राजे पंचम जॉर्ज व राणी मेरी भारत भेटीवर आले होते. दुपारी ४ वाजता एका सजवलेल्या नावेतून राजा–राणी अपोलो बंदराच्या धक्क्यावर उतरले. त्यांचे १०१ तोफांच्या सलामीने जोरदार स्वागत करण्यात आले. आज जेथे गेटवे ऑफ इंडिया आहे तो तेव्हा नव्हता. राजा-राणीची मुंबईत मोठी शोभायात्रा काढण्यात आली. या निमित्ताने मुंबईत चारपाच दिवस दिवाळीच साजरी झाली होती. ५ डिसेंबरला सकाळी शाही दांपत्य घारापुरीला गेले आणि त्याच रात्री साडेअकरा वाजता त्यांनी दिल्लीत जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. अपोलो बंदर ते बोरीबंदर भव्य रोषणाई केलेली होती. या शाही भेटीच्या प्रीत्यर्थ नंतर गेटवे ऑफ इंडिया बांधला गेला. हेच पंचम जॉर्ज नोव्हेंबर १९०५ मध्ये प्रिंस ऑफ वेल्स म्हणून आले होते. त्यावेळी मोठ्या बोटींसाठी अद्यावत गोदीचा 'न्यू डॉक प्रोजेक्ट' हाती घेण्यात आला होता. त्याची कोनशिला त्यांनी बसविली. त्यावेळी डॉकला पंचम जॉर्जची आई अलेक्झांड्रा यांचे नाव देण्यात आले. १९१४ साली बांधून पूर्ण झालेला 'अलेक्झांड्रा डॉक' आज 'इंदिरा डॉक' म्हणून ओळखला जातो. याच भेटीत पंचम जॉर्जनी 'प्रिंस ऑफ वेल्स म्युझियम'चीही कोनशिला बसविली होती.

पण १९२१ साली भारतास भेट देणाऱ्या 'प्रिंस ऑफ वेल्स'ची म्हणजे पंचम जॉर्जचे पुत्र व सहाव्या जॉर्जचे बंधू, यांची 'भारत भेट' मात्र दुर्दैवी ठरली. ते १९३६ मध्ये काही काळ आठवे एडवर्ड म्हणून राज्यावर आले. वॉलीस सिंप्सन या तरुणीशी विवाह करण्यासाठी पार्लमेंटचा विरोध होता, म्हणून त्यांनी राजत्याग केला व ड्यूक ऑफ विंडसर म्हणून खाजगी जिणे पसंत केले. त्यांच्या भारत भेटीच्या वेळी असहकारितेचे आंदोलन चालू असल्याने काँग्रेसने स्वागत समारंभावर बहिष्कार टाकला. मुंबईत ते येण्याअगोदरच निदर्शने सुरू झाली. १७ नोव्हेंबरला ते बंदरात उतरण्याच्या वेळीच एल्फिन्स्टन मिलच्या आवारात विदेशी कापडाची प्रचंड होळी पेटविण्यात आली. युवराजाच्या स्वागतानंतर परतणाऱ्या लोकांवर दगडफेक झाली. ही दंगल चार दिवस चालू होती.. दंगलीत ४०० जण जखमी झाले तर २३ मृत्युमुखी पडले. स्वराज्याचे वारे भारताच्या आसमंतात घोंघावू लागले होते. इंग्रज सत्तेला हादरे बसत होते. साम्राज्यशाही, वसाहतवादातून जग बाहेर येत होते. त्यात ब्रिटीश साम्राज्याला महायुद्धाचे ग्रहण लागले. औद्योगिक क्रांतीच्या बेगडी भरभराटीला मंदीच्या तडाख्याने जमिनीवर आणले. दंडुक्याने फार काळ राज्य चालवता येत नाही हे सिद्ध होऊ लागले. भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली आणि आज ती भारताची आर्थिक राजधानी झाली आहे.

**हसरी रेखा** **-प्रदीप कोठारे**



Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

# Desai'cively yours

**-Anuradha Simit Desai**

It was a morning like any other, simply chaotic. Routine whirlwind activities were churning the household, hubby getting ready for work, Ads dressing for school, packing her bag, breakfast, dabbas, Abs needing attention...thankfully I was only leaving much later that day, so I did not have an individual whirlwind myself, just support action. As hubby and Ads left on time, a crisis was averted, and the whole house breathed a huge sigh of relief.

On to the next phase then, I handed Abs her toothbrush and went into the kitchen to look into the menu for the day. The cook who had managed to put in an appearance that day loves to chat and sensing that I was not about to bite her head off now started her stories. "Taiiii....do u know there's a man climbing on our building...". Me, absentmindedly, "Yeah?...". That was enough fodder for her to launch into the complete narrative. A man was climbing on the outside of the building on a pipe, and he had apparently reached the sixth floor. He was on the other side of the building towards the main road, and was proving to be an attraction for the crowd. Though what really seemed to amuse her no end was his attire, or lack thereof. It seems he was clad only in shorts... "kkaayyy ho Taiiii...."....the phone interrupted this juicy bit of gossip.

It was hubby on the line..."there's a man climbing our building!! And he has reached the eighth floor!!" Me: "yeah, yeah...stale news, maid already told me". I passed on the progress of the shirtless climber to our cook, who was suitably impressed.

It seemed like something that one reads or hears about, then forgets, not something of consequence or immediate concern. And so it was with some surprise that I saw a bunch of people on the road below when I went out into the balcony. They all seemed to be looking up our building. But hey, I said to myself, this person's on the other side of the building, so why are these people here? "Where did you say this man was again", I asked the cook. "Nahiiii Taiiii....he's on the other side, you don't worry" she said, and having created a suitable mess of the kitchen (for which she thinks she is employed), she left. As I was about to yell at Abs to get on with brushing her teeth, I heard sirens screaming, which brought me out into the balcony again. And right enough there were now a couple of fire brigade engines along with a now large crowd clutching umbrellas in the heavy downpour, and peering up at our building. Ok, I told myself, perhaps the fire brigade wants to go in from this side to rescue the guy so as not to startle him. But then why were there so many people and all of them looking up our side of the building, and wait, there were people in balconies in the opposite building also looking at this side. I couldn't get a much better view of the building wall from the balcony, so I thought perhaps I could see what was going on from the children's bedroom window.

Their bedroom was as it was when they got up, beds unmade, windows shut, and curtains drawn. So in I went, to open the window and peer out. I pulled the curtains apart, to get the shock of my life. The man was in my window! There, right outside, climbing on the grill....in pouring rain, on the twelfth floor!!! It was quite a vision believe me, this was a very dark man, yes, clad only in shorts, drenched in rain, and in my window on the twelfth floor! I dragged the curtains shut in double quick time, and ran out to call security. "Ho Madam, the fire brigade have gone up" was the response. "But he is in my window!" "Ho Madam, the fire brigade have gone up"! Huh?? Why have they gone up? He is in my window.

Now I was beginning to panic. I peeped out of the curtains again, sure enough he was there. I ran out to the balcony, followed faithfully by my bewildered toothbrush fairy. Another fire engine had joined the fray, the crowd had swelled, the rain was heavier, and apparently the legendary climber was refusing to be rescued. Back again to the window, man still there, struggling all across the window, up, down, and across. After getting to the twelfth floor effortlessly, he was stuck outside my window, and couldn't seem to go anywhere. I was really worried for him now, didn't want him falling from this height. I couldn't let him come inside either because of the grills. So there was practically nothing useful I could do except pace back and forth between the balcony and the bedroom window. This high drama continued for about a very long 20 mins during which time a lady from a balcony right across from the window started talking to the guy, assuring him that it would be alright, that no one would beat him, to take the help. They were trying to pull him up from the refuge area on the 14th floor. Thankfully the man was finally pulled up to safety, I checked and double checked to make sure. It later emerged that the man lived in a village close by, and was mentally unstable. He was spotted climbing the building when he reached the first floor itself, but instead of coming down, he kept climbing up.

Phew...that was a close call. Once the morning drama was over, everybody dispersed and I returned to finally brushing Abs' teeth.

I have since studied the pipes on which the man climbed, they don't have any footholds, must've been Spiderman!

*

## *Bol Baby Bol*

This one I've shared on FB, but too good to miss. Gems while practicing Hindi grammar with Ads for the exams. Change the gender:

Ladka.....Ladki

Baccha....Bacchi

Badshah....Badshi (me stunned)

Aadmi....(Ads thinks this is a trick question, so applies her intelligence)....Aadma! (triumphant look on her face)

*




लेखांक ९

# चिमणीच्या दातांनी

## छंदवर्ग

-कल्पना सुभाष कोठारे

शाळेतील निबंधविषयात, 'माझा आवडता छंद' हा विषय हमखास असे. मात्र त्याकाळी 'छंदवर्ग' हा प्रकार जवळजवळ नव्हताच! चित्रे चिकटवून वही करणे, म्हणी, सुभाषिते जमविणे, पोस्टाची तिकीटे जमवून 'अल्बम' करणे यासारखे छंद असत. काळाबरोबर छंदाचे प्रकार बदलले व पैसे म्हणजे फी देऊन छंद जोपासणे सुरू झाले.

हौसेखातर सुट्टीमध्ये बहिणीने मला नाचाच्या क्लासला घातले होते. तिथे पुरुष मास्तर 'कथ्थक' नृत्य शिकवीत. दिवाळी व मे महिन्याच्या सुट्टीत शिकलेले नाच गावाकडच्या शाळेत परतल्यावर स्टेजवर करून दाखवायचे, असा 'सिलसिला' थोडे दिवस चालला. 'गाणे टिकते, नाच टिकत नाही' असे आई म्हणाली होतीच! तसेच झाले. लवकरच नृत्य संपले. मात्र त्या पायाभूत ज्ञानामुळे अस्मादिक आजही दुसऱ्यांच्या कथ्थक नृत्याचा आस्वाद छान घेऊ शकतात.

गावच्या शाळेत संध्याकाळी गायन क्लास भरत असे. तिथेच मला गायनाची एबीसीडी- आय मीन- सारेगम- शिकता आले. 'रजतरंगी नटले वसुधातल। मंद, मंद ये पवन सुशीतल।' हे पटदीप रागातले गाणे गाण्याच्या वहीतील श्रीगणेशा असल्याचे आठवते. स्थाई, अंतरा, ताना, यमन, भूप, बिलावल, भैरव, भैरवी, बागेश्री, आसावरी वगैरे वगैरे शब्दांनी ज्ञानात भर पडत होती. परंतु शाळा सरकारी असल्याने अचानक काकिर्डेबाई या गायन शिक्षिकेची बदली झाली. गायनवर्ग मधेच बंद पडला. घरी ऑर्गन म्हणजे बाजापेटी होती. थोडे दिवस एक गायनमास्तर त्या पेटीवर शिकविण्यास घरी येत. परंतु हायस्कूलच्या वाढत्या अभ्यासामुळे या शिकवणीसही रामराम ठोकावा लागला.

शाळेतून जिल्हास्तरीय चित्रकलेच्या परीक्षेस विद्यार्थी पाठविले जात. याकरिता चित्रकला शिकविणाऱ्या बाईंच्या घरी वर्ग घेतला जाई. फ्रीहॅन्ड डॉईंग, मेमरी डॉईंग, जॉमेट्रीकल डॉईंग व ऑब्जेक्टिव्ह डॉईंग असे चार विषय शिकविले जात. यापैकी चौथा विषय त्या वयात नीटसा उलगडलाच नाही. एक डोळा बंद करून पेन्सिलने दुरून समोरच्या ठोकळ्यावर ठेवलेल्या वस्तूचं माप घेऊन चित्र काढावे लागे. हे प्रकरण जड गेल्याने आयुष्यात प्रथमच अपयशाची माळ माझ्या गळ्यात पडली. मात्र त्याकाळी जर्मनीहून भावाने पाठविलेल्या रंगपेटीतील मोहक रंगाची जी भूल पडली ती आजतागायत कायम आहे. भेटकार्डे बनविण्यास अजूनही या छंदाचा वापर होतो.

मुंबईत येताच पिंगेज क्लासेसची गाठ पडली. हा छंद नसला तरी लोकलच्या प्रवासाचा सराव या क्लासमुळे झाला. कॉलेजनंतर भरतकामाच्या क्लासला मी जावे म्हणून मावशी मला हिंदू कॉलनीतील पिरोजबाई पुरोहितांकडे घेऊन गेली. बारा वाजता कॉलेज संपल्यावर घाईघाईने डबा खाऊन मी हिंदू कॉलनी गाठत असे. जरा उशीर झाला की बाईंचे टोमणे खावे लागत. जेमतेम चार महिने हजेरी लावलेल्या या छंदवर्गाने मला खूप काही दिले. लाँग अँड शॉर्ट टाक्यांचे भरतकाम, योग्य रंगसंगती आणि मुख्य म्हणजे हातातील काम पूर्ण करणे- या चांगल्या गोष्टी मी इथे शिकले.

अंधेरी येथे गजराबाई अजिंक्य यांचा शिवणक्लास होता. क्लासमधील पायमशीन व घरचे हातमशीन यांची सांगड घालीत मी कपडे बेतण्यास शिकले. पुढे मुलगी बारावीत येईपर्यंत गणवेषासहीत तिचे सर्व कपडे मी शिवीत असे. मग मात्र 'रेडिमेड'च्या सुंदर दुनियेत तिला मोकळे सोडले व शिवणाचा छंद फक्त बाळंतविड्यापुरताच मर्यादित ठेवला.

'मशीन एम्ब्रॉयडरी शिकू या?' उषा सेंजितने एकदा विचारले. थोडे दिवस हा छंदवर्ग मी एन्जॉय केला. कोर्स संपताच उषाने मला तिचे छपाईकागदही दिले. मात्र मी या छंदवर्गात काम केले तेवढेच! पुढे प्रगती शून्य!

फार पूर्वी पूनम देसाई, कुर्डीकर हिच्याकडे कापडावरील पेंटिंगच्या छंदवर्गाला जाण्याचा योग आला होता. उतारवयातही मी हा छंद जोपासू शकते कारण हल्ली बाजारात पेन्समधून कपड्याचा रंग उपलब्ध आहे. जेष्ठ नागरिकांनी अवश्य या छंदाचा लाभ घ्यावा असे मला वाटते. या ना त्या निमित्ते मित्रमैत्रिणी व नातलग यांना मी गतवर्षी जवळजवळ २६, २७ जोड्या उशीअभ्रे पेंटिंग करून भेट देऊ शकले.

नागपूरच्या भर उन्हाळ्यात महाल ते धंतोली हे लांब अंतर सायकल रिक्षाने काटून माझी आई 'फळांचे टिकाऊ पदार्थ' शिकण्यास जात असे. पुढे या वर्गाचे सरकारीकरण झाले व अनेक वर्षांनंतर या छंदवर्गास माझा दोन वहिन्यांसमवेत जाण्याचा योग आला. आम्ही तिघी व आमच्या तीन मुली या छंदवर्गात लोणची, सॉसेस, मुरांबे व सरबते शिकलो. आजही कोणाकोणाला परीक्षेच्या यशानंतर पैसे बक्षीस न देता मुरांब्याची बाटली हाती ठेवतांना जीव सुखावतो व सहाजणींचा तो 'धूमशान' एकदिवसीय छंदवर्ग आठवून गंमत वाटते.

एकदा एका शेजारणीच्या आग्रहावरून असाच एकदिवसीय 'नॉनव्हेज' क्लास केला होता. सध्या वर्तमानपत्रे व दूरदर्शन वाहिन्यांवर इतके खाद्यपदार्थांचे पेव फुटलेले आहे की असा वर्ग स्वत: चालू करावा असे कधीच वाटत नाही. अपवाद मात्र एक दिवसाच्या ब्रेड-क्लासचा आहे. मावसजावेकडे 'बेकिंग'चा छंदवर्ग पूर्वी शिकल्यानंतर आता अधूनमधून मीच ब्रेडचे तऱ्हतऱ्हेचे प्रकार शिकविण्याचा आनंद घेते.

'तुम्ही इतका उशीर का केलात?' माझ्या वयाकडे बघून माझ्या पेटी (हार्मोनियम) टीचरने मला प्रश्न केला होता. वर्षभर हा छंदवर्ग चालू होता. तसेच दोन वर्षे मी चक्क 'भावगीते' शिकावयास जात होते. 'गाता गळा, पिकता मळा' याचा प्रत्यय आला. रोज सकाळी सराव करावा लागे. इथे मला खूप तरुण मैत्रिणी मिळाल्या. माझ्या सत्तरीला आम्ही वीसजणींनी जुनी भावगीते गाऊन सोसायटी दणाणून सोडली होती.

मशीन एम्ब्रॉयडरीप्रमाणेच मशीननीटिंग या छंदवर्गातही मी फार प्रगती केली नाही. परंतु फी न देता शिकलेला वीणकामाचा छंद आजही चालू आहे. नखाइतक्या 'लेडीबर्ड'पासून १२, १४ इंची डॉल्स, टेडीपर्यंत वीणकाम चालूच असते. पैसे देऊन शिकलेल्या योगविद्येपेक्षा लहानपणी शिकलेले पोहणे मला जास्त भावते.

'जॅक ऑफ ऑल ट्रेडस् अँड मास्टर ऑफ नन्' असे मात्र मी मुळीच वाटून घेत नाही. त्या त्या वेळी , तो तो छंदवर्ग मला आनंद देऊन गेला ही ईश्वरी कृपाच होय. 'पैसे फुकट गेले याने व्हायोलिन (तबला वगैरे) मधेच सोडले! -अशी तक्रार एखादी आई करते तेव्हा तीच चुकत असते. मुलांना नेणे, आणणे हे काम करणारे आजचे आजीआजोबांनीही हल्लीच्या बालकांच्या छंदवर्गास नाके न मुरडता त्या आनंदात सहभागी व्हावे व स्वत:च्या छंदाकडेही लक्ष पुरवावे. मग ते साधे फिरणे किंवा देवळात जाणे का असेना!

बागकाम, ओरोगामी, स्पॅनिश शिकणे वगैरे वगैरे अनेक छंदवर्ग मला खुणावीत आहेत तेव्हा तूर्तास बाय! सी यू!

पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाज व पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटी, खार यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १८ नोव्हेंबर २०१२ रोजी खारच्या पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात दुपारी ३ वाजता पुढील स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

सर्व ज्ञातीय बंधु-भगिनींनी तसेच बच्चे कंपनीनी बहुसंख्येने सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी कराव्यात.

१) **रांगोळी स्पर्धा**- (वेळ १ तास)

विषय- देवळाचा देखावा (१५ वर्षांखालील)

विषय- ठिपक्याशिवाय गालिचा (१५ वर्षांवरील)

सूचना- खडू, पट्टी, ठिपक्यांचा कागद अथवा कोणतेही चित्र सोबत नसावे.

२) **चित्रकला स्पर्धा**- (वेळ ३० मिनिटे) (१५ वर्षांवरील)

विषय- सूर्यास्ताचा देखावा (१५ वर्षांखालील)

विषय- प्राणीसंग्रहालय (१५ वर्षांवरील)

सूचना- कागद पुरविला जाईल. रंग ज्याचे त्याने आणावे.

३) **हस्तकला स्पर्धा**- (वेळ ३० मिनिटे)

विषय- सुशोभित कॅलेंडर तयार करणे (१५ वर्षांखालील)

विषय- भेट कार्ड (१५ वर्षांवरील)

सूचना- साहित्य ज्याचे त्यांनी आणावे.

४) **संगीत स्पर्धा**-

विषय- मराठी सिनेसंगीत (१५ वर्षाखालील)

विषय- हिंदी सिनेसंगीत (१५ वर्षाखालील /१५ वर्षांवरील)

सूचना- साथसंगत उपलब्ध असेल.

५) **फॅन्सीड्रेस स्पर्धा**- (वेळ ३ मिनिटे)

अ-गट ८ वर्षांपर्यंत; ब- गट ८ वर्षांवरील ते १५ वर्षांपर्यंत; क- गट १५ वर्षांवरील;

६) **एकपात्री अभिनय स्पर्धा**- (वेळ ५ मिनिटे)

१५ वर्षांखालील / १५ वर्षांवरील

शनिवार दि. १ डिसेंबर २०१२ रोजी पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटीचे सांस्कृतिक केंद्र, खार येथे पाठारे प्रभु सोशल समाजाचे दिवाळी संमेलन श्री. अजबसेन इंद्रसेन नवलकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरे करण्यात येईल.

या निमित्ताने वलय निर्मित 'विरंगुळा' हा रंगारंग कार्यक्रम साजरा केला जाईल. या कार्यक्रमासाठी सर्व ज्ञातीय बंधु-भगिनींनी अवश्य सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा. अधिक माहितीसाठी कृपया चिटणीसांकडे संपर्क साधावा-

सौ. नीता मिलिंद सेंजित- ९८२०१६६६२८

श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर- ९८६७९५८५३५

रविवार दि. ५ ऑगस्ट रोजी पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा गणसंख्येअभावी सायं. ५ वाजता स्थगित होऊन ५.३० वाजता पुन्हा सुरू झाली.

प्रभु सेमिनरी शाळेत संपन्न झालेल्या या सभेची सुरुवात अध्यक्षा श्रीमती प्रमिला तळपदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून झाली. समाजाचे विश्वस्त श्री. मधुकर यशवंतराव तळपदे यांचे दु:खद निधन झाल्याने (२९ मे २०१२) त्यांना उपस्थितांनी २ मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहिली. विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी विश्वस्त कै. मधुकर तळपदे यांच्या कार्याचा आढावा घेऊन आपले मनोगत व्यक्त केले. तसेच विश्वस्त श्री. अजित तळपदे व कार्यकारी सभासद श्री. नैशद विजयकरांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभुतरुणास देणगी

❁ दिव्येश, मंदार, उर्मिन, सिमरीन आणि चिन्मय (मोंटू) कडून आजी श्रीमती संध्या नारायण विजयकर यांच्या ७-१०-२०१२ रोजी पार पडलेल्या ८५व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सप्रेम भेट रु. १००१/

## पाठारेप्रभुमहिलासमाज

पाठारे प्रभु महिला समाजातर्फे उत्कृष्ट 'दांडिया' कार्यक्रम सौ. रीटा मंदार नायक यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार २७ ऑक्टोबर २०१२ रोजी सायंकाळी ६.०० ते १०.०० पर्यंत पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात गायत्री मंदिराशेजारी, प्रभु नगर, १२वा रस्ता, खार (प.) येथे आयोजित केला आहे.

**सर्वोत्कृष्ट वेशभूषा व नृत्यासाठी एकंदर १२ बक्षिसे आहेत.**

सर्वोत्कृष्ट वेशभूषा व नृत्य- मुलगा व मुलगी :- वयोगट १० वर्षाखालील (एकंदर ४ बक्षिसे)
सर्वोत्कृष्ट वेशभूषा व नृत्य- मुलगा व मुलगी :- वयोगट १० वर्षावरील (एकंदर ८ बक्षिसे)

खास लोकोग्रहास्तव यावर्षीही पाठारे प्रभु महिला समाजाने ज्येष्ठ बंधुभगिनींसाठी (६० वर्षांवरील) सर्वोत्कृष्ट वेशभूषा व नृत्याकरिता खास बक्षिसे ठेवली आहेत. तसेच `Lucky Dip' मध्ये १० बक्षिसे ठेवली आहेत.

प्रथम प्रवेश घेणाऱ्या २५ मुला-मुलींना (१५ वर्षीखालील) खास चॉकलेट्स देण्यात येतील. तसेच सर्व उपस्थितांना महिला समाजातर्फे कुपनानुसार अल्पोपहार देण्यात येईल.

या कार्यक्रमाच्या सन्मानिकेसाठी कार्यकारी समितीच्या भगिनींकडे / कार्यवाहकांकडे चौकशी करावी. सर्व बंधुभगिनींनी या कार्यक्रमात अवश्य भाग घ्यावा, असे समाजाच्या कार्यकारिणीने विनविले आहे.

शुक्रवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२ रोजी दुपारी ४ वाजल्यापासून प्रभू सेमिनरी सभागृह, तळमजला, झावबा राम मंदिराच्या समोर, भाई जीवनजी लेन, ठाकूरद्वार येथे पुढील स्पर्धा घेण्यात येतील. स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी दुपारी ३.३० वाजता येणे. या स्पर्धा फक्त महिला सभासदांसाठी आहेत.

१) ***रांगोळी स्पर्धा***- महिलांसाठी (वेळ १ तास) कै. कमळाबाई ना. त्रिलोकेकर स्म.,कै. गणपतराव एस. त्रिलोकेकर स्म., कै. माणकबाई शामराव त्रिलोकेकर स्म., कै. गंगाबाई महादेव धिरंधर स्म., कै. श्रीमती अन्नपूर्णा सच्चिदानंद नवलकर स्म. व कै. श्रीमती कुमुद गणपतराव प्रधान स्मरणार्थ. **विषय**-बैलांना घेऊन शेत नांगरणारा शेतकरी काढून रंगविणे. (माप- २ फूट X २ फूट). *सूचना*:- खडू, पट्टी. ठिपक्यांचा कागद अशा कोणत्याही वस्तूंचा वापर करू नये. सोबत कोणतेही चित्र नसावे.

२) ***चित्रकला स्पर्धा***- मुलींसाठी (वेळ १ तास)
कै. सोनाबाई धीनाथ अजिंक्य स्म., कै. गंगाबाई नारायण ब्रह्मांडकर स्म., कै. बाबुराव बा. राणे स्म., कै. सौ. चंपुबाई विनायक जयकर स्म., कै. श्रीमती कलावती रामराव आनंदकर स्म., कै. श्रीमती मालिनी जयवंत तळपदे स्म. व कै. रोहिणी चंद्रकांत विजयकर स्म. (विशेष बक्षिस)
***विषय***- आयत्यावेळी दिलेले चित्र क्रेयॉन कलरने रंगविणे. (५ ते ८ वर्षे) *सूचना*- चित्र पुरविले जाईल. क्रेयॉन कलर ज्याचे त्याने आणावे.
***विषय***- दिवाळी (वय ९ ते १५)
*सूचना*- कागद पुरविला जाईल. चित्र काढण्यासाठी लागणारे साहित्य ज्याचे त्याने आणावे.

३) ***पाककृतीस्पर्धा***:- (महिलांसाठी)
कै. सत्यभामाबाई लाडकोबा स्म., कै. जयवंत बाळकृष्ण विजयकर स्म., कै. कला सुशील कीर्तिकर स्म., कै. सौ. रोशन शामराव तळपदे स्म., कै. कुसुम दत्तात्रय तळपदे स्म. व कै. श्रीमती जोत्स्ना विजय देसाईस्म.
***विषय***- बोंबलाचे मुंबरे (घरून करून आणणे.)
**मुलींसाठी**:- कै. विमल सुरजनाथ जयकर स्म., कै. शुभ्रकांता सुरेंद्र जयकर स्म., कै. श्रीमती कला शंकरराव मानकर स्म., कै. सौ. मीना माधव विजयकर स्म. व कै.रोहिणी चंद्रकांत विजयकर स्म. (विशेष बक्षिस)
***विषय***- शेवपुरी (कृती स्पर्धेच्या ठिकाणी करणे) (वेळ १ तास)

याचदिवशी सायंकाळी ४ वाजता दिवाळीनिमित्त गरजू भगिनींना लुगडी वाटप केले जाईल. गरजू भगिनींनी आपले अर्ज रविवार दिनांक ३० सप्टेंबर २०१२ पर्यंत सौ. मेघना राणे, श्री सिद्धारूढ प्रसाद, ब्लॉक नं १, पहिला मजला, ३६२, जगन्नाथ शंकर शेट रोड, मुंबई-४००००२ येथे आणून द्यावेत.


**MAHABALESHWAR**

*COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH JASMINE COTTAGE*




*THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST*
*ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE*

**FACILITIES:**
* Attached bath
* Hot & Cold Running water
* Television with Satellite Connection
* Car Parking
* Large open area for playing outdoor games

**Location:**
It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

***For Booking Contact:***
***Velkars 9930172689 9220451465***


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळसाखर दिला

२६-०८-१२ श्री, अमेय अभय कीर्तिकर कु. तृप्तू सुधाकर कीर्तिकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २१-०९-१२ | सौ. सीमा मदनमोहन नवलकर | वय ७३ | प्रभादेवी |
| २५-०९-१२ | श्री. अरुण शामराव कोठारे | वय ७२ | भाई जीवनजी लेन |
| २९-०९-१२ | श्रीमती सुवर्णा अनंतसेन सेंजित | वय ८८ | पॅरेमाऊंट यु.एस.ए. |
| ०७-१०-१२ | श्री. चंद्रकात माणिकराम नवलकर | वय ९५ | फणसवाडी |

(पान ५ कॉलम ४ वरून)
सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांनी गतवर्षी रविवार दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून सर्वानुमते मंजूर करण्यात आली. तसेच १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ पर्यंतचा समाजाच्या कामकाजाचा अहवाल व ताळेबंद वाचून एकमताने मंजूर करण्यात आला.

पाठारे प्रभु सोशल समाजाची तहहयात सभासद वर्गणी रु. २०१/- ऐवजी रु. ३०१/- आकारण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी सभेपुढे ठेवण्यात आला व सभेने तो एकमताने मंजूर केला. त्यानुसार गुरुवार दि. १ नोव्हेंबर २०१२ पासून समाजाची तहहयात सभासद वर्गणी रु. ३०१/- आकारली जाईल याची सर्व ज्ञातीय बंधु-भगिनींनी नोंद घ्यावी. शेवटी कॉफीपानाने या सभेची सांगता झाली.

*

## अभिनंदन

❁ डॉ. मधुबाला बाळाजी राव यांची जागतिक पातळीवर पहिल्या शंभर वैज्ञानिकात निवड होऊन त्यांना लंडन येथे पारितोषिक दिले जाणार आहे. असे पारितोषिक स्वीकारण्याची त्यांची ही दुसरी खेप आहे. मन:पूर्वक अभिनंदन. डॉ. मधुबाला यांच्याविषयी सविस्तर लेखदिवाळी अंकात वाचा.

## परीक्षेतील सुयश

**दहावी**

श्री.सन्मान संजय धुरंधर
गुण ३१५/६०० ६३.६० %

## पा. प्र. चॅरिटीज
## व्यंकटेश मंदिर

अधिक मासानिमित्त रविवार दि. १९ ऑगस्ट रोजी सामुदायिक विष्णू सहस्त्रनाम व व्यंकटेश स्तोत्र म्हणून १६ भक्तांनी हजार तुळशी वाहिल्या.

रविवार दि. २६ ऑगस्ट रोजी ५२ सवाष्णींनी पंचारत्या ओवाळून व्यंकटेशापुढे आरती केली.

रविवार दि. २ सप्टेंबर रोजी हळदीकुंकवाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी १७५ स्त्रिया उपस्थित होत्या.

## प्रतिक्रिया

Respected Madam,
Prabhu Tarun August 2012

I really apprciate the editorial of Prabhu Tarun which reflects your hold over the pen.

I also appreciate the following lines in the report on Charities newsletter of July 2012. perticularly, I would like to pinpoint the following lines which highlight your command over the marathi language and probing eyes of Editor.

'न्यूज लेटर पा. प्र. चॅरिटीझ' यात नुकत्याच झालेल्या श्री. अजित विजयकरांच्या सत्कार समारंभाची उजळणी यांनी हा अंक उजळून निघाला आहे.

(-**अरविंद धराधर :** २६८४५४७९